Estd 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## "निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती" नियमावली

१. या पारितोषिकाचे नामाभिदान "निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती" असे राहील.

२. सदरची शिष्यवृत्ती शिवाजी विद्यापीठाच्या "डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" मध्ये राहून पदार्थ विज्ञान विषयात एम.एस्सी. भाग १ यशस्वीरित्या पूर्ण करून भाग २ मध्ये शिक्षण घेत असणा—या व गुणवत्तेनुसार प्रथम असणा—या दोन विद्यार्थ्यांना समान दोन भागात विभागून दिली जाईल असे विद्यार्थी दोन पेक्षा अधिक असतील तर गुणवत्तेनुसार पहिल्या दोघांना सदरची शिष्यवृत्ती देण्यात येईल.

३. वरील गोष्टींची पूर्तता होत नसली आणि असा एकच विद्यार्थी असेल तर दुसरा विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पदार्थ विज्ञान विभागाच्या विभागप्रमुखांच्या सल्ल्यानुसार एम.एस्सी. भाग २ मधील होतकरू व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यास देण्यात येईल.

४. कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असा एकही विद्यार्थी नसेल तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पदार्थ विज्ञान विभागाच्या विभागप्रमुखांच्या सल्ल्यानुसार एम.एस्सी. भाग दोन मधील दोन विद्यार्थी निवडून त्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येईल. निवड करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आर्थिक स्थिती या दोन गोष्टी लक्षात घेण्यात येतील.

५. देणगी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून येणा—या रक्कमेपैकी प्रशासकीय खर्च व कॉर्पस वजा जाता उर्वरित रक्कमेतून अनुज्ञेय रक्कमेची शिष्यवृत्ती दिली जाईल.

६. या शिष्यवृत्तीची अंमलबजावणी मार्च/एप्रिल, २००४ च्या परीक्षेपासून करण्यात येईल.

७. सदरची शिष्यवृत्ती दरवर्षी ५ सप्टेंबर, शिक्षक दिन या दिवशी केली जाईल.

८. शिष्यवृत्तीसंदर्भातील सर्व हक्क विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहतील.